ISSN No-2031-5063 Vol.1,Issue.VII/Jan 2012pp.1-4

Research Paper

# ''राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे वैचारिक प्रबोधन ''

**प्रा. षरद जानराव वाघोळे,**
यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय
मंगरूळपीर जि. वाशिम. 444403

**प्रस्तावना :–**

भारतातील संताची परंपरा खूप मोठी असून त्यापैकी तुकडोजी महाराज एक महत्वपूर्ण संत आहेत. राश्ट्रसंताचे कार्य व्यापक स्वरूपाचे आहे. त्यांचा जन्म विदर्भातील यावली या गावी झाला. परंतु त्यांचे कार्य राश्ट्रीय स्तरावर महत्वपूर्ण ठरले. त्यांनी मानवाच्या विकासाठी, मनुश्याच्या समृध्दीसाठी, देशाच्या विकासाकरिता सतत कार्य केले. प्रत्येक संताचा काळ व त्या काळातील समस्या ह्या वेगवेगळ्या आहेत असे दिसुन येते. राश्ट्रसंताचा काळ हा भारताच्या गुलामगिरी व स्वातंत्र्य या दोन्हीचा समन्वयाचा कालखंड आहे. महाराजांनी दोन्ही शासन व्यवस्था पाहिल्या आहेत.

राश्ट्रसंताच्या विचाराचे खरे प्रतिबिंब त्यांनी लिहिलेल्या 'ग्रामगीता' या ग्रंथात दिसून येते. 'ग्रामगीता' हा राश्ट्रसंताचा ग्रंथ ओवीबध्द स्वरूपाचा आहे. त्यामध्ये एकूण 41 अध्याय असून ते आठ पंचकात विभागल्या गेले आहे. राश्ट्रसंतानी आपल्या ग्रामगीतेतून देवदर्शन, धर्मस्थापन, प्रपंच–परमार्थ, जीवन, शिक्षण, महिलोन्नती, संघटनशक्ती, वैवाहिक जीवन, भू–वैकुंठ या संबंधीचे शास्त्रशुध्द स्वरूपाचे विवेचन केले आहे. ''ग्रामगीता ही भगवतगीतेचा पुनरावतार होय. भगवतगीता कुरूक्षेत्रावर सांगण्यात आली. करू याचा अर्थ 'कर' असा आहे. कर्तव्यापासून च्युत झालेल्या अर्जुनाला भगवंतानी कर्तत्य कर असे सांगितले.

ग्रामगीता सुध्दा कर्तव्यविमुख ग्रामांना आज तीच दीक्षा देत आहे. येथे श्रोते अर्जुनाप्रमाणे कर्मवीर नाहीत. ती अद्याप साधी माणसेही नाहीत म्हणून त्यांनी प्रथम माणसे बनविण्याचा विचार प्रामुख्याने या ग्रामगीतेत सांगितला आहे''1 देशातील सर्वात महत्वाचा घटक म्हणजे 'ग्राम' व त्या ग्रामातील महत्वपूर्ण घटक म्हणजे व्यक्ती आहे. त्याचा विकास झाला पाहिजे. हीच राश्ट्रसंताची भूमिका होती. त्यांच्या काळात समाजजीवनाची वाताहत झाली होती. समाजजीवन विस्कळीत झाले होते. लोक धर्म, रूढी, प्रथा, परंपरा यांच्या विळख्यात अडकले. त्यामध्ये आणखी भर पडली ती गुलामगिरीची भारत देश इंग्राजांच्या दास्यात सापडला शिक्षण, चारित्र्य, अनिती, अंधश्रध्दा, वर्णभेद, दुर्व्यसने या मध्ये लोक सापडले. या सर्व वाईट परिस्थितीमधून मानवाला तसेच राश्ट्राला नवसंजीवनी देण्यासाठी राश्ट्रसंतानी 'ग्रामगीता' लोकांना समजावून सांगितली. त्यांनी खंजेरी व भजनाच्याव्दारे लोक जागृतीचे कार्य केले.

तुकडोजी महाराजांनी 'ग्राम' आणि त्यातील सामान्य व्यक्ती 'ग्रामनाथ' यांना आदर्श करण्यासाठी आपले लक्ष केंन्द्रित केले. भारत हा गावात वसला आहे म्हणून गावातील सामान्य नागरिक हा आदर्श झाला पाहिजे ही त्यांची तळमळ होती गाव हा सुंदर झाला पाहिजे. गाव सुंदर करायचे असेल तर त्यामधील मानव व त्यांचे वर्तन चांगले व्हावे याकरिता त्यांनी संस्कारांना महत्व दिले

''प्रथम पाया मानव वर्तन । यास करावे उत्तम जतन ।
गाव करावे सर्वागपूर्ण । आदर्श चित्र विश्वाच्या ।।''

राश्ट्रसंतानी आपल्या ग्रामगीतेमध्ये मानवी वर्तनाला महत्वाचे स्थान दिले. गांव ख–या अर्थाने सुंदर, संपन्न, आदर्श करावे असे वाटत असेल तर प्रथम गावातील 'मनुश्य' आदर्श झाला पाहिजे. त्याचे आचारविचार चांगले असावे याकरिता त्यांनी मानवी वर्तनाला महत्वाचे स्थान दिले. त्याच प्रमाणे गावातील गरजा गावातच पूर्ण झाल्या पाहिजे अशी त्यांची धारणा होती. तुकडोजी महाराजांनी आपल्या ग्रामगीतेमध्ये मानवाचे आचार चांगले असावे दुस–याची उणीव, आपत्ती पाहून मदतीला जावे. दुस–याचे वैभव पाहून मनातल्या मनात जळू नये. कश्टकरी वर्गाला प्रतिश्ठा मिळावी माणसाने द्रव्याचा लोभ करू नये आपला परका असा भेदभाव करू नये अशी सतत जाणीव करून दिली. धर्म' ही जीवन जगण्याची व्यवस्था आहे. धर्माच्या नावाखाली वाद–विवाद करू नये. कोणताही धर्म श्रेश्ठ–कनिश्ठ नसतो. धर्माचे स्वरूप सांगतांना ते म्हणतात.

'अनेक प्राणी जेथे राहती ।
त्या सर्वाची रहावी सुस्थिती
समान समाधानाची गति।
त्यास धर्म म्हणावे' ।....... ग्रा.अ.2 ओवी 3

अनेक जाती – समूह एकत्र गावात राहतात त्यांच्यामध्ये सहजीवन जगण्याची जाणीव असली पाहिजे. सर्वाना आपला धर्म व विकास करण्याची समान संधी मिळावी या करिता धर्म परंपरा सागितली आहे. सर्व विश्व सुखी करावे अशी धर्माची दृश्टी असली पाहिजे असे विचार त्यांनी प्रतिपादन केले. त्याग, अहिंसा, सत्यपूर्ण वर्तन, अपरिग्रह यांची जोपासना प्रत्येक माणसाने केली पाहिजे असे राश्ट्रसंताना वाटत होते. प्रत्येक मनुश्याने शरीर, मन, वाणी, इंद्रिये, बुध्दी यांचा विकास साधावा. त्यालाच धर्म म्हणावे असे त्यांना वाटते.

राश्ट्रसंतानी मानवी जीवनाला चार आश्रमामध्ये विभागले आहे. प्रत्येक आश्रमामध्ये योग्य वर्तन व संस्कार झालेच पाहिजे. अशी त्यांची आंतरिक इच्छा होती. आपला भविश्यकाळ सुखी गेला पाहिजे असे वाटत असेल तर ब्रम्हचार्याश्रम पाळला पाहिजे असे त्यांचे मत होते. लहान मूल जन्मला येते परंतु त्याच्यावर संस्कार गर्भधारणेपासून सुरू होतात. म्हणून गर्भातील मुलावर मातापित्यांनी संस्कार करावे. अश्लील भाशण, अश्लील दृश्य, वाईट अन्न, व्यसने गर्भवतीबाईने टाळल्या पाहिजे. सात्विक अन्न, सात्विक विचार, उत्तम चिंतन, आदर्शग्रंथाचे वाचन करावे. आपल्या मुलावर आई वडिलांनी उत्तम संस्कार टाकावे

''घडवावा उत्तम संस्कार ।
मायबाप शिकविती सदाचार ।
व्हावया उत्तम, गुणी, चतुरे ।
मोठेपणी । अ. 2 ओ. 46

ग्रामातील पुरूश व स्त्रिया ह्या आदर्श असाव्यात. त्यांच्यातील सहजीवन धर्माप्रमाणे आदर्श असावे. उत्तम गुणांनी युक्त तरूण समाजाला, व्देशाला उच्च ठिकाणी घेऊन जातो. त्याची जाणीव तरूणाला झाली पाहिजे. असा आदर्श विद्यार्थी पुढे उत्तम

नागरिक होतो. परंतु त्यासाठी त्यांना उत्तम गुरू मिळाला पाहिजे. गुरूजन कसे असावे या करिता ते सांगतात.

'गुरूजनांनी ऐसे द्यावेत धडे ।
आपुला आदर्श ठेवोनि पुढे
विद्यार्थी तयार होता चहूकडे ।
राष्ट्र होई तेजस्वी ।।' अ. 2 ओ. 87

राष्ट्रआदर्श व संपन्न करण्यासाठी त्यामधील तरूण सर्वगुणांनी संपन्न व्हावा. त्याचे जीवन व संसार सुंदर असावा. अर्थप्राप्तीचे साधन तसेच जीवन जगण्याची पध्दती सुंदर असावी. त्यामुळे संसार सुखी होतो. समाजमन संस्कार संपन्न होते. 'संसार आणि परमार्थ' हे दोन्ही गृहस्थाश्रमी जोपासले गेले पाहिजेत. संसार नीट करून मग परमार्थ केला पाहिजे.

'नेटका ऐसा प्रपंच केला ।
तरी परमार्थ त्यातचि साधला ।
हा समन्वय संती सांगितला ।
तोचि खरा ग्रामधर्म ।'' अ.4 ओ. 122

मानवाने प्रथम पुत्रधर्म, पितृधर्म, ग्रामधर्म नंतर विश्वधर्म पालन करावा. संसार आणि परमार्थ दोन्हीमध्ये मनुश्याला समान गती असावी. जात, धर्म, पंथ, उच्च–कनिश्ठ असा भेद वृत्तीमध्ये करू नये. आपले गाव, समाज, व्देश आदर्श असावे. असे सर्वांना वाटते परंतु त्याकरिता त्याग, संयम, सेवा करण्याची आस्था असावी असे राश्ट्रसंताना वाटते.

समाजाची उन्नती करण्यासाठी राश्ट्रसंतानी आपल्या ग्रामगीतेमध्ये भू–वैकुंठाची संकलपना मांडली. त्यांनी खेड्यापाड्यात जावून ग्रामीण लोकांचे लोकशिक्षण केले. सार्वजनिक प्रार्थना, सहभोजन, व्यापार उद्योगवर्ग निर्माण करण्यास प्रोत्साहन दिले. समाजाची उन्नती म्हणजेच प्रत्येक मानवाची, गावाची उन्नती त्यांना अभिप्रेत होती. खेडे स्वयंपूर्ण झाले पाहिजे या संदर्भात डॉ. श्रीकांत तिडके म्हणतात ''खेड्यांना स्वयंपूर्ण करतांना खेड्यातील उत्पादनांना बाजारपेठेत महत्वाचे स्थान मिळणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील कच्या मालाचे सात्यत्याने शोशण झाले हे थांबविण्यासाठी ग्रामस्वराज्याचा अभ्यास असणा–या तुकडोजीसारख्या नेतृत्वाची गरज आज तिव्रपणे भासतेय.''2 ग्रामीण समाजाची खरी नाडी राश्ट्रसंताना सापडली होती. त्यांनी ग्रामणी समाजाला प्रगतीकडे नेण्याचा मार्ग ग्रामगीतेमधून सांगितला.

राश्ट्रसंताच्या काळात सामाजिक संदर्भ लक्षात घेतांना असे दिसून येते की, या काळात स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनिय झाली होती. स्त्रियांना पुरूशांपेक्षा कमी दर्जाची वागणूक दिली जात होती. शिक्षण, आरोग्य, सामाजिक हक्क या सर्वच बाबतीत स्त्रिया पुरूशांपेक्षा मागे होत्या. समाजातील समाजपुरूशाची प्रगती करावयाची असेल तर स्त्रियांना मागे राहून चालणार नाही. त्यासाठी राश्ट्रसंतानी महिलोन्नतीचा मार्ग दाखविला. राश्ट्रसंताच्या या विचाराचा गौरव करताना डॉ. राम घोडे म्हणतात ''भारतातील जवळजवळ सर्वच संतानी स्त्रियांच्या उध्दाराविशयीची उत्कट तळमळ आपल्या आचार–विचारातून व्यक्त केलेली आहे. शुद्रांप्रमाणेच स्त्रियांनवरही उपेक्षितपणाचे शिक्कामोर्तब झाले होते आणि म्हणूनच या संत मंडळींनी आपआपल्या काळात स्त्री–मुक्ती आंदोलनाची चळवळ आपल्या वाड्ःमयातून उभारलेली दिसते.''3 राश्ट्रसंताची ग्रामगीता या संदर्भात पुरोगामी विचाराची ठरली आहे.

राश्ट्रसंताच्या काळात भारत हा इंग्रजांच्या गुलामगिरीमध्ये होता. भारतीय जनतेला परकीय गुलामगिरीमधून मुक्त केले पाहिजे यासाठी राश्ट्रसंतानी अत्यंत महत्वपूर्ण योगदान दिले. भारतातील जनता स्वतंत्र व्हावी ही त्यांची इच्छा होती. त्यांनी 1933 साली चिमूरला राश्ट्रजागृतीकरिता लोकशिक्षणाचे कार्य केल. लोकांना स्वतंत्र्य प्राप्ती विशयी प्रेरणा देण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. 1942 च्या स्वातंत्र्यलढ्यात राश्ट्रातील लोकांना स्वातंत्र्यलढ्याला प्रेरित करण्यासाठी अनेक भजने रचली.

''अब काहेको धूम मचाते हो, दुखवाकर भारत सारे ।
आते है नाथ हमारे ।
झाड झडुले शस्त्र बनेंगे, भक्त बनेगी सेना ।
पत्थर सारे बॉम बनेंगे, नाव लगेंगी किनारे ।''

अशा प्रकारचे स्वातत्र्य चळवळीला प्रात्साहन देणारे भजने म्हटल्या मुळे पुढे त्यांना कारावास सहन करावा लागला. परंतु यामधून त्यांची दूरदृश्टी दिसून येते. आजही स्वातंत्र्यानंतर अनेक वर्शांनी राश्ट्रसंताचे ग्रामगीतेमधून व्यक्त झालेले विचार कालोचीत वाटतात. शिक्षण, आरोग्य, ग्रामसुधारणा, स्त्रियांची उन्नती, राश्ट्रउभारणी या सर्वच संदर्भात त्यांच्या विचाराची गरज निर्माण झाली आहे. मा. दिनदयाल गुप्त म्हणतात ''आजच्या अणुबॉमच्या हिंस्त्र युगामध्ये मानवाच्या ख–या मूलभूत प्रेरणांची गरज आहे. त्या प्रेरणा महाराज आपल्या वाणीने जागृत करीत आहेत आणि तिला मूर्तस्वरूपात आणण्याचे कार्य त्यांचे आश्रम, त्यांचे शेकडो शाखामध्ये पसरलेले गुरूदेव सेवामंडळ वार्शीक गांधी – निर्वाण सप्ताह, आदर्श ग्रामनिर्माण, व्यायाम मंडळ, हया सा–या संस्था करीत असलेले आढळते. त्या सर्व संस्थांना सतत भावनांचे अन्न पुरवण्याचे काम ही ग्रामगीता करील व ती सामान्य जनतेच्या अंतःकरणाची पकड घेऊन त्याला उन्नत व अभ्युदयप्रवण करील यात शंकाच नाही.''4 हे दिनदयाल गुप्त यांचे विचार सतत ग्रामगीतेच्या संदर्भात उपयुक्त वाटतात. अनेक वर्शांपर्यंत ही ग्रामगीता वैचारिक खाद्य पुरविण्याचे कार्य करीत आहे. संतांनी आपल्या विचारांनी समाजाला सतत प्रगतीपथावर नेण्याचे कार्य केले. त्यांनी समाजाला दिशा दाखविण्याचे काम केले. त्यांची भूमिका ही लोकशिक्षकाची होती. या संदर्भात डॉ. रामचंद्र देखणे म्हणतात की ''संतांची भूमिका ही केवळ तत्वचिंतकाची नाहीतर तत्वचिंतकाबरोबर लोकशिक्षकाची आहे''.5

राश्ट्रसंताची ग्रामगीता ही आधुनिक समाजाला पुढे प्रगतीपथावर नेण्याकरिता दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करीत आहे. असे राश्ट्रसंताच्या विचारांना कालातीत मूल्य लाभले असून राश्ट्रउभारणीच्या कार्यात 'ग्रामगीता' हा ग्रंथ महत्वपूर्ण ठरला आहे.

### *संदर्भ*

1. ''ग्रामगीता'' संपादकः सुदाम सावरकर, चौदावी आवृत्ती 16 ऑक्टो. 2003 श्रीगुरूदेव ग्रामगीता प्रतिश्ठान, अ.भा. श्रीगुरूदेव सेवामंडळ, गुरूकुंज मोझरी जि. अमरावती पृ. 15.
2. ''राश्ट्रसंत तुकडोजी महाराज गौरव ग्रंथ'' संपादकः प्राचार्य रा.तु. भगत, प्रथमावृत्ती 2009 चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर पृ. 149
3. समर्थ रामदास : संत तुकडोजी मौलीक दर्शन : प्रा. डॉ. राम घोडे, प्रथमावृत्ती 1988, राजीव प्रकाशन नागपूर – 22 पृ. 88
4. 'ग्रामगीता' संपादक : सुदाम सावरकर उ.नि. पृ 27
'दैनिक लोकमत' : लेख 'अध्यत्म' डॉ. रामचंद्र देखणे, .